# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

सूचना का अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ/नों. क्र. २९५४/१९/अ. क्र. १७६०/२२/०१**

**Shri. Dinesh Jagabhai Babariya**
C/o Public Concern for Governace Trust,
B/2, Mahalaxmi Chambers, 22,
Bhulabai Desai Road, Mumbai – 400026.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (घ.क.व्य.) डी विभाग**
डी विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त,
डी विभाग कार्यालय, महापालिका कार्यालय इमारत, दुसरा मजला,
जोबनपुत्र कंपाऊंड, नाना चौक, ग्रँट रोड, मुंबई ४०० ००७.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त डी विभाग**
डी विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त,
डी विभाग कार्यालय, महापालिका कार्यालय इमारत, दुसरा मजला,
जोबनपुत्र कंपाऊंड, नाना चौक, ग्रँट रोड, मुंबई ४०० ००७.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक :**
**२१.१२.२०२१/१०.०३.२०२२/१२.०५.२०२२/१६.०६.२०२२/२१.०७.२०२२/२५.०८.२०२२/१३.१०.२०२२/१५.१२.२०२२/१४.०३.२०२३/०३.०४.२०२३**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

**उक्त प्रकरणी दिनांक २१.१२.२०२१ रोजी आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:**

अपीलकर्त्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम-६(१) अन्वये दि. १५.०१.२०१९ रोजी जन माहिती अधिकाऱ्याकडे माहिती अर्ज सादर केला. सदर अर्जान्वये त्यांनी, Kindly refer to the attachment dt. ३१.१०.२०१८ in which shri. M .J. Ghaadi public information officer and administrative officer, D Ward, MCGM बाबतची सविस्तर माहिती/छायांकित कागदपत्रांची मागणी केलेली होती.

अपीलकर्त्याने आयोगाकडे दि. ३१.०५.२०१९ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपील दाखल केले असून त्याद्वारे असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ३१.१०.२०१९ रोजी असे उत्तर देण्यात आले की, आपणांस अपेक्षित असलेली काही माहिती देण्यात आली आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश धारिकेमध्ये दिसून येत नाही.

आजच्या सुनावणीस अपिलकर्ता यांनी असे विशद केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही. तसेच त्याच्या वडीलांनी सन २०१४ मध्ये सेच्छानिवृत्ती घेण्यात आली त्यानंतर आतापर्यंत त्यांना सेवानिवृत्ती नंतरचे फायदे म्हणजेच निवृत्तीवेतन व भविष्य निर्वाह सोडून कुटुंब निवृत्तीवेतनबाबतची माहिती का देण्यात आली नाही.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (घ.क.व्य.) डी विभाग, श्रीमती प्रतिमा घाडी यांनी असे सांगितले की, अपिलकर्ता यांना माहिती देण्यासाठीचा पाठपुरावा चालू आहे.

तरी अपिलाची सुनावणी तहकूब करण्यात येत आहे. सदर **अपिलाची पुनर्सुनावणी दिनांक १०.०३.२०२२ रोजी दुपारी ०३.०० वाजता** आयोगात प्रत्यक्ष आयोजित करण्यात येत आहे. तरी अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्वत: उपस्थित राहावे. त्यानंतर या प्रकरणी अंतिम आदेश पारित करण्यात येतील."

**उक्त प्रकरणी दिनांक १०.०३.२०२२ रोजी आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:**

"आजच्या पुनर्सुनावणीस श्रीमती. प्रतिमा घाडी, जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी व श्रीमती. श्वेता रहटळ, मुख्य लिपिक उपस्थित आहेत.

श्रीमती. प्रतिमा घाडी, जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी यांनी असे विशद केले की, अपीलकर्ता यांना तोंडी कळविण्यांत आले होते की, त्यांच्या आईचे कुटुंब निवृत्ती वेतन चालू करण्यासाठी आई सोबत कार्यालयात उपस्थित राहावे. परंतु ते उपस्थित राहिले नाही.

जन माहिती अधिकारी यांनी पुढे असे विशद केले की, त्यांच्या वडीलांची ग्रज्युटी देण्यासाठी त्यांची प्रक्रिया चालू आहे.

अपीलकर्ता अनुपस्थित आहेत. तरी अपीलाची सुनावणी तहकूब करण्यात येत आहे. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना अपेक्षित असलेल्या माहितीसह उपस्थित राहावे. सदर **अपीलाची पुनर्सुनावणी दिनांक २१.०४.२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता** आयोजित करण्यात येत आहे. तरी अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी स्वत: उपस्थित राहावे. त्यानंतर या प्रकरणी अंतिम आदेश पारित करण्यात येतील."

**उक्त प्रकरणी दिनांक १२.०५.२०२२ रोजी आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:**

आजच्या पुनर्सुनावणीस अपिलकर्ता यांचा मुलगा श्री. राजेश दिनेश बाबरीया उपस्थित असून त्यांनी असे विशद केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. तरी अपिलाची सुनावणी तहकूब करण्यात येत आहे. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना अपेक्षित असलेल्या माहितीसह उपस्थित राहावे. सदर **अपिलाची पुनर्सुनावणी दिनांक १६.०६.२०२२ रोजी दुपारी ०३.०० वाजता** आयोगात प्रत्यक्ष आयोजित करण्यात येत आहे. तरी अपिलकर्ता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्वत: उपस्थित राहावे. त्यानंतर या प्रकरणी अंतिम आदेश पारित करण्यात येतील.

**उक्त प्रकरणी दिनांक १६.०६.२०२२ रोजी आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:**

आजच्या पुनर्सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, श्रीमती. प्रतिमा घाडी व श्रीमती. श्वेता रहटळ, मुख्य लिपिक उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, श्रीमती. प्रतिमा घाडी यांनी असे विशद केले की, अपीलकर्ता यांच्या आईचे कुटुंब निवृत्त वेतन आणि उपदान (gratuity) मंजूरीसाठी लेखा अधिकारी यांना दि. ०२.०६.२०२२ रोजी पाठविण्यांत आले आहेत. तसेच अपीलकर्ता यांना मंजूरी प्राप्त झाल्यानंतर कुटुंब निवृत्त वेतन आणि उपदान (gratuity) देता येईल.

यास्तव अपीलाची सुनावणी तहकूब करण्यात येत आहे. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना अपेक्षित असलेल्या माहितीसह उपस्थित राहावे. सदर **अपीलाची पुनर्सुनावणी दिनांक २१.०७.२०२२ रोजी दुपारी ०३.०० वाजता** आयोगात प्रत्यक्ष आयोजित करण्यात येत आहे. तरी अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी स्वत: उपस्थित राहावे. त्यानंतर या प्रकरणी अंतिम आदेश पारित करण्यात येतील.

**उक्त प्रकरणी दिनांक २१.०७.२०२२ रोजी आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:**

आजच्या पुनर्सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, श्रीमती. प्रतिमा घाडी व श्रीमती. श्वेता रहटळ, मुख्य लिपिक उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, श्रीमती. प्रतिमा घाडी यांनी असे विशद केले की, अपीलकर्ता यांच्या आईचे कुटुंब निवृत्ती वेतन आणि उपदान (gratuity) शेवटच्या मंजूरीसाठी निवृत्ती वेतन विभागाकडे पाठविण्यांत आले असून त्यांना असे अपेक्षित आहे की, कुटुंब निवृत्ती वेतनाला दि. ०५.०८.२०२२ रोजी पर्यंत मंजूरी मिळेल.

यास्तव अपीलाची सुनावणी तहकूब करण्यात येत आहे. सदर **अपीलाची पुनर्सुनावणी दिनांक २५.०८.२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता** आयोजित करण्यात येत आहे. तरी अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्वत: माहितीसह उपस्थित राहावे. त्यानंतर या प्रकरणी अंतिम आदेश पारित करण्यात येतील.

**उक्त प्रकरणी दिनांक २५.०८.२०२२ रोजी आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:**

आजच्या पुनर्सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, श्रीमती. प्रतिमा घाडी व श्रीमती. श्वेता रहटळ, मुख्य लिपिक उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी श्रीमती प्रतिभा घाडी यांनी असे विशद केले की, अपीलकर्ता यांच्या आईचे कुटुंब निवृत्ती वेतन आणि उपदान (gratuity) मंजूर झाले आहे. तसेच सोबत थकबाकी रक्कम अपीलकर्ता यांच्या आईच्या खात्यात दि. ०१.०९.२०२२ रोजी जमा होईल.

यास्तव अपीलाची सुनावणी तहकूब करण्यात येत आहे. सदर **अपीलाची पुनर्सुनावणी दिनांक १३.१०.२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता** आयोजित करण्यात येत आहे. तरी अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्वत: माहितीसह उपस्थित राहावे. त्यानंतर या प्रकरणी अंतिम आदेश पारित करण्यात येतील.

**उक्त प्रकरणी दिनांक १३.१०.२०२२ रोजी आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:**

आजच्या पुनर्सुनावणीस अपीलकर्ता यांनी असे विशद केले की, आईचे उपदान (Grauity) संबंधित माहिती प्राप्त झाली नाही.

यास्तव अपीलाची सुनावणी तहकूब करण्यात येत आहे. सदर **अपीलाची पुनर्सुनावणी दिनांक १५.१२.२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता** आयोजित करण्यात येत आहे. तरी अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्वत: माहितीसह उपस्थित राहावे. त्यानंतर या प्रकरणी अंतिम आदेश पारित करण्यात येतील.

**उक्त प्रकरणी दिनांक १५.१२.२०२२ रोजी आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:**

आजच्या पुर्नसुनावणीस अपिलकर्ता उपस्थित. जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलकर्त्यांनी विशद केले की, त्यांच्या आईचे उपदान आणि रजा रोखीकरण इ. ची माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. यास्तव, प्रकरण तहकूब करण्यात येत आहे.

तरी अपिलाची सुनावणी तहकूब करण्यात येत आहे. सदर **अपिलाची पुनर्सुनावणी दिनांक ०२.०३.२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजता** आयोगात प्रत्यक्ष आयोजित करण्यात येत आहे. तरी अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्वत: माहितीसह उपस्थित राहावे. त्यानंतर या प्रकरणी अंतिम आदेश पारित करण्यात येतील.

**उक्त प्रकरणी दिनांक १४.०३.२०२२ रोजी आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:**

आजच्या पुनर्सुनावणीस अपीलकर्ता यांनी असे विशद केले की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपदान आणि रजा रोखीकरण इत्यादीची माहिती अद्यापर्यंत मिळालेली नाही.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी आज तिसऱ्यांदा अनुपस्थित आहेत. यास्तव अपीलाची सुनावणी तहकूब करण्यात येत आहे. सदर **अपीलाची पुनर्सुनावणी दिनांक ०३.०४.२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजता** आयोजित करण्यात येत असून अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी स्वत: माहितीसह उपस्थित राहावे. जर जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित राहिले तर त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यता येईल. त्यानंतर या प्रकरणी अंतिम आदेश पारित करण्यात येतील.

आजच्या पुनर्सुनावणीस अपीलकर्ता यांनी असे विशद केले की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून रजा रोखीकरण व उपदानाची माहिती अद्याप पर्यंत प्राप्त झाली नाही.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी आज चौथ्यांदा अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, श्रीमती. प्रतिमा घाडी यांना असे आदेश देण्यातय येत आहेत की, अपीलकर्ता यांना रजा रोखीकरण व उपदानाची माहिती अद्याप पर्यंत का देण्यात आलेली नाही याबाबत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे सकृतदर्शनी उल्लंघन केल्यामुळे त्यांच्या विरुद्ध या अधिनियमाच्या **कलम २०(१) व २०(२)** अन्वये कार्यवाही का करु नये, याबाबतचे स्पष्टीकरण आयोगात १५ दिवसात सादर करावे. जर जन माहिती अधिकारी यांचे स्पष्टीकरण १५ दिवसात आयोगात प्राप्त झाले नाही तर त्यांना याबाबत काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**या प्रकरणात अपीलकर्ता यांना अक्षम्य विलंबामुळे आर्थिक नुकसान व मानसिक त्रास झाल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम-१९(८) (ख) नुसार रु. १५,०००/- (रु. पंधरा हजार फक्त) ची नुकसान भरपाई महानगरपालिकेच्या कोषागारातून ३० दिवसाच्या आत देण्यात यावी.**

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(सुमित मल्लिक)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०३.०४.२०२३

**प्रत** : आयुक्त, बृहन्मुंबई महानगर पालिका, बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय, महापालिका मार्ग, मुंबई-१ यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.

*Pragati 03.04.2023*